# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
## मा.इ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- २
## सभावृत्तांत

**दिनांक - ०३/०५/२०१८** **वेळ सकाळी ११:०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०३/०५/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **“संत ज्ञानेश्वर महाराज”** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.श्रीम.भिमाबाई पोपट फुगे - **अध्यक्षा**

२) मा.श्रीम.बुर्डे सुवर्णा विकास

३) मा.श्री.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

४) मा.श्री.डोळस विकास हरिचंद्र

५) मा.श्री.उंडे लक्ष्मण धोंडू

६) मा.श्रीम.घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन

७) मा.श्रीम.गायकवाड निर्मला मनोज

८) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी

९) मा.श्रीम.बारसे प्रियांका प्रविण

१०) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

११) मा. श्री Avd. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१२) मा.श्री.बुर्डे अजित प्रताप - स्विकृत सदस्य

१३) मा.श्रीम.तापकीर साधना सचिन - स्विकृत सदस्य

१४) मा.श्री.लांडे विजय नामदेव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.नितीन कापडणीस - क्षेत्रीय अधिकारी, श्री.अनिल थेऊरकर – प्र.प्रशासन अधिकारी, श्री.निकम एम.बी.लेखाधिकारी - श्री.जीवन गायकवाड – कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत).श्री.राजेंद्र शिंदे -उपअभियंता (स्थापत्य), श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य), श्री.डी.डी.गवळी -उपअभियंता (ज.नि.) श्री.ताकवले क.अभियंता (स्थापत्य.), श्री.क्षीरसागर आर.व्ही. क.अभियंता (स्थापत्य.), श्री.वाडकर एस.व्ही. - क.अभियंता (स्थापत्य),श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.साबळे- आर.आर- आरोग्य निरीक्षक, श्री.म्हेत्रे एच.जे.- उद्यान सहाय्यक, श्री.डी.डी.सटाणे - (स्थापत्य उद्यान), श्री.एन.सी.पारसी - आरोग्य निरीक्षक, (पशुवैद्यकिय), श्री.डामसे आर.पी. – मलेरिया निरीक्षक, श्री.गायकवाड पी.आर.मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्रीमती. जे.एस.

भोज – क्रीडा पर्यवेक्षक श्री.एन.जे.फुगे.प्र.क्रीडा पर्यवेक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**------**

विषय क्रमांक २. प्रभाग क्र. ५ गवळीनगर मधील अंतर्गत रस्त्यांचे नामकरण करणेबाबत...
मा.सागर बाळासाहेब गवळी यांचे दिनांक ५/४/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक ३. प्रभाग क्र. ५ गवळीनगर मधील कमान पाडून नव्याने कमान करणेबाबत...
मा.सागर बाळासाहेब गवळी यांचे दिनांक ५/४/२०१८ चे पत्र.

-------

अ) दिनांक ०१/०२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ७ )
सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १७/०२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ८ )
सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ०१/०३/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ९ )
सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले

------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक- १

दिनांक- - ०३/०५/२०१८

सूचक- मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.हिराबाई (नानी)घुले

संदर्भ - च-होली गावातील इंद्रायणी नदीवरील पुलाला नाव देणेबाबत.

मा.नितीन प्रताप काळजे, महापौर यांचे दिनांक ०९/०४/२०१८ चे पत्र.

मा.नितीन प्रताप काळजे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी च-होली गावातील इंद्रायणी नदीवरील पुलाला **श्रीमंत सरसेनापती खंडेराव दाभाडे (सरकार) पूल हे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.**

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-------**

ठराव क्रमांक - ०४ विषय क्रमांक- २

दिनांक- - ०३/०५/२०१८

सूचक- मा.प्रा.सोनाली गव्हाणे अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ - प्रभाग क्र. ५ गवळीनगर मधील अंतर्गत रस्त्यांचे नामकरण करणेबाबत...

मा.सागर बाळासाहेब गवळी यांचे दिनांक ५/४/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्रमांक ५ मधील गवळीनगर वॉर्डातील बहुतांशी रस्ते हे गवळी कुटंबियांच्या मालकीचे आहेत. तरी सदर गवळी कुटुंबियांच्या मागणी नुसार तेथील रस्त्याला पुढील प्रमाणे नामफलक

लावण्यात यावे. १) सर्व्हे नं. २२४ सत्यानारायण सोसायटी – कै.गेनू कोंडीबा गवळी मार्ग २) सर्व्हे नं. २२४ संत तुकडोजी महाराज सोसायटी – कै. गेनू कोंडीबा गवळी मार्ग ३) सर्व्हे नं. २२४ दिघी भोसरी रोड – कै. शंकर परशुराम गवळी  मार्ग ४) सर्व्हे नं. २२४ श्रीकृष्ण हौसींग सोसायटी – कै.शिवराम गवळी मार्ग ५) सर्व्हे नं. २२३ संत ज्ञानेश्वर हौसींग सोसायटी – कै. मोरुभाऊ हरी गवळी मार्ग ६) सर्व्हे नं. २१६ मध्ये कै. दत्तात्रय जिजाबा भोसले (गवळी) मार्ग ७) सर्व्हे नं. २१६ कै.शंकर दत्तात्रय भोसले (गवळी) मार्ग ८) सर्व्हे नं. २१६ गणराज हौसींग सोसायटी कै.नारायण संभाजी भोसले (गवळी) मार्ग ९) सर्व्हे नं. २०८ ओम साई पार्क – कै पिलाजी राणू गवळी मार्ग १०) सर्व्हे नं. २०८ राहुल पार्क – कै.शंकर सावळेराम गवळी मार्ग ११) सर्व्हे नं. २०९ संभाजीनगर – कै. मारुती गबाजी गवळी मार्ग. यादीप्रमाणे नामफलक करणेबाबत मान्यता देणेत येत आहे

---------

ठराव क्रमांक - **०५** | विषय क्रमांक- ३

दिनांक- - **०३/०५/**२०१८ | विभाग –

सूचक- मा.सागर गवळी | अनुमोदक – मा.प्रा.सोनाली गव्हाणे

संदर्भ  -. प्रभाग क्र. ५ गवळीनगर मधील कमान पाडून नव्याने कमान करणेबाबत...

मा.सागर बाळासाहेब गवळी यांचे दिनांक ५/४/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ५ गवळीनगर सँडविक कॉलनी प्रभागातील सावंतनगर येथील जुनी काँक्रिटची कमान धोकादायक झालेली आहे. सदर ठिकाणी कमान पडून अपघात होण्याची शक्यता आहे. तरी सदर कमान पाडून नव्याने कमान करणेबाबत कार्यवाही व्हावी ही विनंती.
तरी सदर कमान पाडण्याबाबत मा.प्रभाग समितीने ठराव करण्यास
मान्यता देणेत येत आहे

**मा. अध्यक्ष -**  यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/कावि/४/१२२/२०१८
दिनांक-    **११/०५/**२०१८.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दिनांक ०३/०५/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.प्रियांका बारसे –** आमचे वॉर्डमधील दुर्गामाता कॉलनी, तुकडोजी कॉलनी व इतर ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकलेली आहे. परंतू मार्च पासून त्या ठिकाणी कोणीही लक्ष दिले नाही. माझा असा हट्ट आहे की, पावसाळा सुरु होणेपुर्वी सर्व कामे पूर्ण झाली पाहिजे. नाही तर दिवाळी झाल्या शिवाय कामे होणार नाही.

**श्री.क्षीरसागर आर.व्ही. क.अभियंता (स्थापत्य.) –** पावसाळा सुरु होणेपुर्वी कामे करुन देतो.

**मा.प्रियांका बारसे –** सर्व कामे अर्जंट असलेबाबत पत्र दिलेली आहेत. वर्षभर ड्रेनेज उपसण्याचे कामे चालू आहे. आता पर्यंत आम्ही अमृत योजनेच्या भरवशावर बसलो आहे. पण ती योजना प्रत्यक्षात आलेली नाही.

**श्री.डी.डी.गवळी -उपअभियंता (ज.नि.) –** सर्व भागातील सर्व्हे करुन पाहतो.

**मा.प्रियांका बारसे –** कचरा गाडीचे जीपीएस केलेले नाही..

**मा.प्रभाकर तावरे – सहा.आरोग्याधिकारी –** नवीन टेंडर वाढविण्यात येईल. जीपीएस यंत्रणेच्या बाबतीत संगणक विभागाला कळविणेत येईल.

**मा.प्रियांका बारसे -** कचरा गाडी प्रत्येक गल्लीमध्ये गेली पाहिजे. ब-याच वेळा कचरा टाकण्यापुर्वीच गाडी येऊन निघुन जाते. कचराकुंडया ठेवल्या नाही त्यामुळे नागरीक इतरत्र कुठेही कचरा टाकतात.

**मा.भिमाबाई फुगे, सभापती –** दिघीरोडला कचरागाडी कुठेही येत नाही. खूप कचरा साठला आहे. ड्रेनेजचा नेहमीच प्रॉब्लेम असतो. त्यामुळे ड्रेनेज लाईन गेली पाहिजे.

**मा.सागर गवळी –** कचरा गोळा करण्यासाठी कच-याची गाडी वेळेवर येत नाही. कधी तरी कच-याची गाडी येते. पण लगेच कचरा न घेताच निघून जाते. त्यामुळे कच-याच्या गाडीचा टाईमींग ठेवा. आजूबाजूच्या परिसरात जो कचरा साठला जातो तो गोळा करुन जाळून टाकला पाहिजे.

ड्रेनेज लाईन पुर्णपणे खराब आहे. ड्रेनेज लाईन नेहमी चोकअप असते. ड्रेनेज नवीन टाकली पाहिजे. पावसाळा सुरु होणेपुर्वी ड्रेनेज सर्व स्वच्छ करावे.

पिण्याचे पाणी अतिशय खराब येते. ब-याच ठिकाणी पाण्याच्या समस्या आहेत. एकच जे.ई.चारही प्रभागातील काम कसा करेल? त्यामुळे कर्मचारी वाढविले पाहिजे. प्रत्येक प्रभागात व्यवस्थित कर्मचारी नियुक्त करावे. सर्व कामकाजाचे आदेश काढणेत यावे.

कमानीची कामे अपुर्ण आहेत. कमानीचे कामे कधी पुर्ण होतील?

**श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य) -** कमानी बांधणेबाबत मा.आयुक्त साहेब यांनी सन २०१२ मध्ये बांधकाम परवानगी घेतल्या शिवाय कमानी बांधू नका असे आदेश दिले आहे. मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली तरच कमानी बांधणेचे कामकाज करण्यात येईल. या वर्षीचे बजेटमध्ये तरतुदी पेक्षा जास्त कामे करायची होती. त्यामुळे बरीचशी कामे नामंजूर केली आहेत.

**मा.सागर गवळी –** भोसरी मधील पी.एम.टी चौकातील कमान ही झालीच पाहिजे.

**मा.प्रियांका बारसे –** माझे वॉर्डमध्ये टॉयलेट करुन मिळावे याबाबत तीन महिन्यापासून पत्र दिले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर गार्डन या ठिकाणी स्वच्छतागृह बांधायचे आहे. सर्व्हे देखील केला आहे. परंतू अद्यापपर्यंत कुठलेही कामास सुरुवात केली नाही.

**मा. विकास डोळस –** संभाजीराजे चौक, दिघी या ठिकाणी अतिक्रमण विभागाने काय कार्यवाही केली आहे. दिघीला एखादी भेट दिली तर बरे हाईल. बोपखेलमध्ये सुध्दा पाहणी केली पाहिजे.

**श्री.थेऊरकर (प्र.प्रशासन अधिकारी)** – मागील काही दिवसात अतिक्रमणबाबत कारवाई करुन सामान जप्त केले आहे. दोन महिन्यापासून पोलीस मिळण्याबाबत पाठपुरावा करात आहे. अतिक्रमण पथकातील कर्मचारी अतिक्रमण बाबत काम करण्यास कमी पडणार नाही.

**मा.सुवर्णा बुर्डे -** प्रभाग क्रमांक ३ मध्ये कच-याची गाडी पंधरा दिवसापासून आली नाही. जलपर्णी वाढल्यामुळे मच्छर खूप झाले आहे. ड्रेनेज तुंबले आहे. त्यासाठी सारखा फोन करावा लागतो.

**मा.हिराबाई (नानी) घुले –** बोपखेल येथे जलपर्णी इतकी वाढली आहे की, त्यामुळे मच्छरांचा नाररीकांना खूप त्रास होत आहे. बोपखेलचा हा गंभीर प्रश्न असल्यामुळे बोपखेलमध्ये भेट देऊन सर्व पाहणी करण्यात यावी.

**श्री.प्रभाकर तावरे (सहा आरोग्याधिकारी)-** सी.एम.ई. व खडकी कॅन्टोमेंट यांना पत्र दिले आहे. नदीपात्रामध्ये मशिन बसविल्या आहेत.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – सर्व वॉर्डमध्ये औषध फवारणी / धुरफवारणी करण्यात यावी.

**मा.विकास डोळस** – सी.एम.ई. व खडकी कॅन्टोमेंट यांना पत्र दिल्यावर ते सहा महिन्यानी उत्तर देणार तोपर्यंत मच्छरांचा त्रास सहन करावा लागणार. आपल्या अडचणी आपणच सोडविल्या पाहिजे. क्षेत्रीय अधिकारी व संबंधीत सदस्य यांनी.एम.ई.च्या अधिका-यांना जाऊन भेटू. तेथील अधिका-यांना भेटल्यानंतर मा.आयुक्त यांना भेटू.

**मा.लक्ष्मण उंडे -** सी.एम.ई. व खडकी कॅन्टोमेंटचे अधिकारी यांना आपण समक्ष भेटू शकतो.

**मा.भिमाबाई फुगे, सभापती -** माझे वॉर्डमध्ये किती दिवसापासून गटटू काढून टाकले आहेत ते बसविण्यात यावे.

**श्री.वाडकर एस.व्ही. - क.अभियंता (स्थापत्य)** – निम्म्या जागेत नवीन व निम्म्या जागेत जूने गट्टू बसविणार आहे. ड्रेनेज विभागाकडील काम झाले की, स्थापत्य विभागाकडून गट्टू बसविण्यात येईल.

**मा.सोनाली गव्हाणे** – माझे प्रभागात गार्डनला नाव दयायचे आहे.

**मा.प्रियांका बारसे –** माझे येथील बॅडमिंटन हॉलला सु.ना. बारसे बॅडमिंटन हॉलला असे नांव देण्यात यावे.

**मा.अजित बुर्डे – (स्विकृत सदस्य)** जलपर्णी खूप वाढली आहे. त्यामुळे डास इतके वाढले आहेत तर मुळे जनावर सुध्दा खाली बसू शकत नाही. तरी मच्छरांसाठी धूर फवारणी करण्यात यावी. व औषध फवारणी सुध्दा झाली पाहिजे. आमचे येथे कोणत्याही प्रकारचे पथदिवे नाहीत. रस्त्यावरुन विषारी साप फिरत आहेत. एका व्यक्तीला सर्पदंश सुध्दा झाला आहे. त्यामुळे रस्त्यावरुन जाणै/येणे अशक्य झाले आहे. तरी रस्त्यावर विद्युतची व्यवस्था करण्यात यावी.

**मा.सागर गवळी –** MSEB चे अधिकारी/कर्मचारी यांना प्रभाग समितीच्या मिटींगला बोलवावे.

**श्री.प्रविण घोडे –कार्यकारी अभियंता (विद्युत)** – MSEB चे अधिकारी/कर्मचारी यांचेसोबत यापुर्वी मिटींग झालेली आहे. तसेच त्यांचेकडे पत्रव्यवहार सुध्दा केलेला आहे. पुढच्या मिटींगला MSEB चे अधिकारी/कर्मचारी यांना मिटींगला बोलावण्यात येईल.

**मा.प्रियांका बारसे –** सर्व प्रभागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले पाहिजे.

**श्री.प्रविण घोडे –कार्यकारी अभियंता (विद्युत) -** सीसीटीव्ही कॅमेरे हे स्मार्ट सिटीमध्ये मध्ये घ्यायचे आहे. याबाबतची काही प्रोसीजर पुर्ण झालेली आहे.

**मा.निर्मला गायकवाड** – दिघीमध्ये प्रत्येक ठिकाणी एलइडी बल्ब बसविण्यात यावे.

**श्री.प्रविण घोडे –कार्यकारी अभियंता (विद्युत) -** एलइडी बल्ब शिल्लक असेल तर बसूवन देतो.

**मा.सागर गवळी** – लाईटचे कामकाज करण्यासाठी सी.डी.ची व्यवस्था करण्यात यावी.

**श्री.प्रविण घोडे –कार्यकारी अभियंता (विद्युत) –** विद्युत विभागाकडील हाइड्रोलिक गाडीवर ड्रायव्हर नाही.

**मा.सागर गवळी** - मा.महापौर साहेब यांचेबरोबर चर्चा झालेनंतर मा. इ प्रभाग समितीची मासिक सभा महिन्याच्या पहिल्या गुरुवारी ऐवजी शुक्रवारी दुपारी २.०० वा.घेण्यात यावी असे ठरले.

**मा.भिमाबाई फुगे, सभापती –मा. अध्यक्षा -** आजच्या मिटींगला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानते. व त्यानंतर सभा संपल्याचे जाहीर केले.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**

**मा.इ प्रभाग समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक- ०३**

**सभावृत्तांत**

ठराव क्रमांक - **३२** विषय क्रमांक- १

दिनांक- - **१२/०३/**२०१८

सूचक- मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.घुले हिराबाई (नानी)

संदर्भ - च-होली गावातील इंद्रायणी नदीवरील पुलाला नाव देणेबाबत.

मा.नितीन प्रताप काळजे, महापौर यांचे दिनांक ०९/०४/२०१८ चे पत्र.

मा.नितीन प्रताप काळजे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी च-होली गावातील इंद्रायणी नदीवरील पुलाला **श्रीमंत सरसेनापती खंडेराव दाभाडे (सरकार)** पूल हे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.